Office of the Supdt. Of Police, Akola
**पोलीस अधीक्षक अकोला यांचे कार्यालय.**
दुरध्वनी क्रमांक- **0724-2435500** फॅक्स क्रमांक- **0724-2445317**
ई-मेल आयडी sp.akola@mahapolice.gov.in

---

क्रमांक :- पोअअ/आस्था.लिपीक/पो.भ.2024-25/लेखी परीक्षा प्रश्न आक्षेप/स्पष्टीकरण/२१५\ /2026,अकोला दि.16.03.2026

---

**विषय :— अकोला जिल्हा पोलीस भरती २०२४—२५ लेखी परिक्षा प्रश्नपत्रिका व उत्तरतालिकेबाबत प्राप्त आक्षेपांवर समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत.**

*****

उपरोक्त विषयान्वये पोलीस अधीक्षक, अकोला आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२४—२०२५ ची लेखी परीक्षा दिनांक १५.०३.२०२६ रोजी घेण्यात आलेली आहे. सदरच्या लेखी परीक्षेत एकुण A,B,C,D असे चार प्रश्नपत्रिका संच देण्यात आले होते. दिनांक १५.०३.२०२६ रोजी सदर परिक्षेचे प्रश्नप्रत्रिका व उत्तरतालिका (संचानुसार) तसेच सुचनापत्र **www.akolapolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानुसार उमेदवारांना दिनांक १५.०३.२०२६ रोली प्रसिध्द केलेल्या प्रश्नपत्रिका व उत्तरतालिकेबाबत काही आक्षेप असल्यास दिनांक १६.०३.२०२६ चे १४:०० वाजेपर्यंत आपले आक्षेप **sp.akola@mahapolice.gov.in** या ई—मेलवर नोंदविण्याबाबत कळविण्यात आले होते.

विहीत कालावधीत ई—मेल व प्रत्यक्ष पोलीस अधिक्षक कार्यालयाला उमेदवारांकडुन प्राप्त झालेले प्रश्नपत्रिका व उत्तरतालिकेबाबत आक्षेपांबाबत नोंद घेवुन प्राप्त सर्व आक्षेप समितीसमोर सादर करण्यात आले त्यानुसार समितीने सविस्तर पुर्नतपासणी व परिक्षण करून प्रश्न व उत्तरतालिकेबाबत आवश्यक सुधारणा व बदल बाबत निर्णय घेतला आहे. त्याबाबतची माहिती यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

सहपत्रः— १. स्पष्टीकरण अहवाल
२. अधिकृत पिकपेरणी अहवाल.

पोलीस अधीक्षक अकोला.

अर्चित चांडक
पोलीस अधीक्षक, अकोला.

## स्पष्टीकरण

आक्षेप क्र. १ : खालील प्रश्नाचे उत्तराचे अनुषंगाने अकोला जिल्हयात सध्या सर्वाधिक क्षेत्रावर पिकाची लागवड ही कापुस नसुन सोयाबीन पिक असलेबाबत आक्षेप घेण्यात आला होता.

प्रश्न : संच **A (Q. 66** Ans: A**)** संच **B (Q. 73** Ans: C**)** संच **C (Q. 82** Ans: A**)** संच **D (Q. 67** Ans: A**)**

**अकोला जिल्ह्यात सध्या सर्वाधिक क्षेत्रावर कोणत्या पिकाची लागवड केली जाते ?**

(A) सोयाबीन (B) ज्वारी
(C) कापूस (D) तूर

स्पष्टीकरण : सदरच्या प्रश्नाची पुर्नतपासणी व पडताडणी करण्याकरीता संबंधीत विभागाचे जिल्हा कृषी अधिकारी यांना सदर प्रश्नाचे अनुषंगाने योग्य व अचुक आकडेवारीसह माहिती अभिप्रायसह मिळविण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला. त्याअनुषंगाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला यांचे *(पत्र क्र.जा.क्र./जिअकृअ/सां/पिक पेरणी/१३४३/२०२६ दिनांक १६/०३/२०२६)* प्राप्त अहवालानुसार सन २०२५ मध्ये जिल्हयाचे एकुण सरासरी क्षेत्र ४३२०३२ हे असुन त्यापैकी एकुण ४३१८८४ (९९:) पेरणी झालेली आहे त्यामध्ये सोयाबीन पिकाचे सर्वाधिक म्हणजेच २२२१५८ हे ऐवढे आहे. तरी या नमुद प्रश्नाचे **'सोयाबीन'** हे उत्तर योग्य आहे. **त्याप्रमाणे सुधारित उत्तरतालिकेत बदल करून प्रसारित करण्यात आली आहे.** (अंतीम पिक पेरणी अहवाल सोबत जोडलेला आहे.)

सुधारीत उत्तरतालिकेनुसार प्रश्नाचे उत्तर:– 'सोयाबीन'

संच **A (Q. 66** Ans: D**)** संच **B (Q. 73** Ans: A**)** संच **C (Q. 82** Ans: B**)** संच **D (Q. 67** Ans: D**)**

—————————————————————————————००—————————————————————————————

आक्षेप क्र. २ : खालील प्रश्न १ ते १५० पर्यंतच्या नैसर्गिक संख्यांच्या घनांची बेरिज विचारली उत्तरात मात्र फक्त नैसर्गिक संख्यांची बेरिज असे पर्याय दिले करीता सदरचा प्रश्न चुकिचा आहे किंवा उत्तर चुकिचे आहे अशाप्रकारचा आक्षेप घेण्यात आला होता.

**प्रश्न :** संच **A (Q. 10,** Ans:**B)** संच **B (Q. 7,** Ans:**C)** संच **C (Q. 12,** Ans:**C)** संच **D (Q. 92,** Ans:**D)**

**पहिल्या 150 क्रमवार नैसर्गिक संख्यांच्या घनांची बेरीज किती ?**

(A) 11175 (B) 11325 (C) 11475 (D) 11250

स्पष्टीकरण : सदरच्या प्रश्नाची पुर्नतपासणी व पडताडणी दरम्यान सदर प्रश्न चुकीचा असल्याचे समितीच्या निदर्शनास आल्याने सदरचा प्रश्न रद्द करून सर्व उमेदवार यांना नमुद प्रश्नाचा **१ गुण** देण्यात येत आहे.

—————————————————————————————००—————————————————————————————

**आक्षेप क्र. ३**: खालील प्रश्न 'मनात मांडे खाणे' या वाकप्रचाराचा मनोरथ रचणे हा योग्य उत्तर म्हणुन उत्तरतालिकेत दर्शविण्यात आला आहे परंतु मराठी भाषेतील वाकप्रचाराच्या अर्थानुसार याचा अर्थ कल्पनेतच सुख मिळविणे / अवास्तव आनंद मानने असा होतो. असा आक्षेप घेण्यात आला होता.

प्रश्न : संच **A (Q. 93** Ans: D**)** संच **B (Q. 33 Ans:A)** संच **C (Q. 75** Ans: **B)** संच **D (Q. 2 Ans: A)**

**'मनात मांडे खाणे' या वाक् प्रचाराचा खालीलपैकी योग्य अर्थ कोणता ?**

(A) मानसिक भूक भागवणे (B) कल्पनेतच सुख मिळविणे
(C) एखादी गोष्ट गुप्त ठेवणे (D) मनोरथ रचणे

**स्पष्टीकरण** : सदरच्या प्रश्नाची पुर्नतपासणी व पडताडणी करण्यात आली त्यावरून समितीकडुन नमुद प्रश्नातील वाक्यप्रचाराचे पर्याय 'मनोरथ रचणे' व 'कल्पनेतच सुख मिळविणे' हे दोन्ही पर्याय योग्य ठरविण्यात आले. दोन पैकी कोणताही एक पर्याय निवडलेल्या उमेदवारांचे उत्तर ग्राहय धरण्यात येत आहे. **त्याप्रमाणे सुधारित उत्तरतालिकेत बदल करून प्रसारित करण्यात आली आहे.**
सुधारीत उत्तरतालिकेनुसार प्रश्नाचे उत्तर:– 'मनोरथ रचणे' व 'कल्पनेतच सुख मिळविणे'

संच **A (Q. 93** Ans: B/D**),** संच **B (Q. 33** Ans:A/C**),** संच **C (Q. 75** Ans: B/D**),** संच **D (Q. 2** Ans: A/D**)**

जा.क्र/जिअकृअ/सां/पिक पेरणी/ 9383 /२०२६
कार्यालय – जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
अकोला. दि. १६/०३/२०२६

प्रति,
मा. अपर पोलीस अधिक्षक
अकोला

विषय – प्रश्नाचे योग्य उत्तराबावत लेखी अभिप्राय मिळणेबावत.

संदर्भ – आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र/२६८७/२०२६.दि.१६/०३/२०२६.

उपरोक्त विषयान्वये अकोला आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२४ – २५ लेखी परीक्षा दि.१५/०३/२०२६ मधील प्रश्न पत्रिकेमध्ये अकोला जिल्ह्यातील सर्वाधिक क्षेत्रावर कोणत्या पिकाची लागवड केली जाते हा प्रश्न समाविष्ट करण्यात आला होता. त्यानुसार कळविण्यात येते कि खरीप हंगाम सन २०२५ मध्ये जिल्ह्याचे एकुण सरासरी क्षेत्र ४३२०३२ हे असुन त्यापैकी एकुण ४३१८८४ हे (९९%) पेरणी झालेली आहे. त्यामध्ये सोयाबीन पिकाचे क्षेत्र हे सर्वाधिक म्हणजेच २२५१५८ हे एवढे आहे. तरी यावरून नमूद प्रश्नाचे उत्तर सोयाबीन हे योग्य आहे. तसेच खरीप २०२५ संयुक्त स्वाक्षरीचा अंतिम पिक पेरणी अहवाल सोबत जोडण्यात येत आहे.करीता माहितीस्तव. सविनय सादर.

सोवत - खरीप २०२५ संयुक्त स्वाक्षरीचा अंतिम पिक पेरणी अहवाल
अ.क्र.12

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
अकोला

Office of the S.P.
AKOLA
S.P.:
Dy. S.P.
(H.Q.)
O.S.
H.C.:
Branch: SB
Date:

16 MAR 2026

OFFICE OF THE SUPERINTENDENT OF POLICE * AKOLA *
INWARD
No 3223
Dt.

## तालुकानिहायपिक अंतिम पिक पेरणी अहवाल खरीप हंगाम २०२५ - २६

| अ.क्र | पिकाचे नाव | तालुका : अकोट | | | तालुका : तेल्हारा | | | तालुका : बाळापुर | | | तालुका : पातुर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी |
| १ | खरीप ज्वार | ५० | ८ | १५ | २३० | २५ | ११ | ५० | ९ | १८ | २६७ | ८७ | ५२ |
| २ | बाजरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | मका | ० | १६३ | ० | १०५ | ६१ | ५८ | २ | ०.९ | ४५ | १० | ० | ० |
| ४ | इतर तृणधान्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण तृणधान्य | ५० | १७१ | ३४१ | ३३५ | ८६ | २६ | ५२ | ९.९ | १९ | २७७ | ८७ | ४१ |
| ५ | तुर | ६५०० | ५६६३ | ८७ | ६००० | ६७८७ | ११३ | १०३४० | ११५३५ | ११२ | ५०५२ | ५६५५ | ११२ |
| ६ | मुग | १०० | ९ | ९ | ४०० | ४९ | १२ | २५० | ७२ | २९ | ८३३ | ५८८ | ६६ |
| ७ | उडीद | ५० | १८ | ३६ | ३०० | १५७ | ५२ | ३१० | १४२ | ४६ | ७४३ | ३९७ | ५३ |
| ८ | इतर कडधान्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण कडधान्य | ६६५० | ५६९० | ८६ | ६७०० | ६९९३ | १०४ | १०९०० | ११७४७.९६ | १०८ | ६६८५ | ६६४० | ९९ |
| | एकुण अन्नधान्य | ६७०० | ५८६१ | ८७ | ७०३५ | ७०७९ | १०१ | १०९५२ | ११७५८ | १०७ | ६८६२ | ६७२६ | ९८ |
| ९ | भुईमुग | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | तीळ | ० | ६ | ० | २ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० |
| ११ | सुर्यफुल | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ४ | ० | ० |
| १२ | सोयाबीन | १३००० | ९११३ | ७० | २२००० | २१७२२ | ९९ | ३५२०० | ३९२५१ | ११२ | २९४७० | ३०५७८ | १०४ |
| | इतर गळीत धान्य | ० | ० | ० | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण गळीत धान्य | १३००० | ९११९ | ७० | २२००४ | २१७२२ | ९९ | ३५२०२ | ३९२५३ | ११२ | २९४७४ | ३०५७८ | १०४ |
| १३ | कापुस | ४५००० | ४९७८१ | १११ | २१००० | २०३४८ | ९७ | १४४०० | ९२६१ | ६४ | ४२६८ | २६१८ | ६१ |
| १४ | ऊस | ० | ० | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ६.०२ | १४ | २३३ |
| १५ | इतर पिके | ० | ८१४ | ० | ० | २०४४ | ० | ० | ३४८ | ० | ० | १३३६ | ० |
| | एकुण खरीप पिके | ६४७०० | ६५५७४ | १०१ | ५००४४ | ५११९३ | १०२ | ६०५५४ | ६०६२९ | १०० | ४०६१० | ४१२७२ | १०२ |

## तालुका निहायपिक पेरणी अहवाल खरीप हंगाम २०२५ - २६

| अ.क्र | पिकाचे नाव | तालुका : अकोला | | | तालुका : बार्शीटाकळी | | | तालुका : मुर्तिजापूर | | | एकुण जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी | सरासरी क्षेत्र | पेरणी क्षेत्र | टक्केवारी |
| १ | खरीप ज्वार | ९०० | ५७ | ६ | २ | ३ | १५० | ५ | ६ | १२० | १४०४ | १३४ | १४ |
| २ | बाजरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | मका | १८ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | १३५ | २२६ | १६७ |
| ४ | इतर तृणधान्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण तृणधान्य | ९१८ | ५७ | ६ | २ | ३ | १५० | ५ | ७ | १४० | १५३१ | ४२० | २७ |
| ५ | तूर | ११००० | ९८२२ | ८९ | ९४३५ | ९०११ | ९६ | ११६५१ | ११६२२ | ९९.७ | ५९३८५ | ६००९५ | १०० |
| ६ | मूग | १००० | ३२१ | ३२ | १६८ | १८० | १०७ | ३५० | १२६ | ३६.१ | ३१६० | १३६५ | ४३ |
| ७ | उडीद | ५०० | २६५ | ५३ | १५० | २०५ | १३७ | १८५ | १६३ | ८८.३ | २२३७ | १३८७ | ६० |
| ८ | इतर कडधान्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण कडधान्य | १२५०० | १०४०९ | ८३ | ९७५३ | ९३९६ | ९६ | २२२१४ | २२११२ | ९७.७ | ६५३८२ | ६२७८७ | ९६ |
| | एकुण अन्नधान्य | १३४१८ | १०४६६ | ७८ | ९७५५ | ९३९९ | ९६ | २२२१९ | २२११९ | ९७.७ | ६६९११ | ६३२०७ | ९४ |
| ९ | भुईमूग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० |
| १० | तीळ | २० | २ | १० | ० | ० | ० | २ | ५ | २३० | २४ | १५ | ६२ |
| ११ | सूर्यफूल | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ११ | ० | ० |
| १२ | सोयाबीन | ४६०९२ | ३९७६७ | ८६ | ४२७६६ | ४१०५४ | ९६ | ४७९३१ | ४३६७४ | ९१.१ | २३६४५९ | २२५२५८ | ९५ |
| | इतर गळीत धान्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.० | ० | ० | ० |
| | एकुण गळीत धान्य | ४६११७ | ३९७६९ | ८६ | ४२७६६ | ४१०५४ | ९६ | ४७९३३ | ४३६७९ | ९१.१ | २३६४९६ | २२५२७३ | ९५ |
| १३ | कापूस | ३२७५० | ३९४४० | १२० | २५४९ | ३५९४ | १४१ | ८६२६ | ११८१६ | १३७.० | १२८५१३ | १३६८५८ | १०६ |
| १४ | ऊस | ३ | ० | ० | ६ | ४ | ० | २ | ० | ० | २१.५२ | १८ | ८४ |
| १५ | इतर पिके | ० | ९८८ | ० | ० | ५८९ | ० | ० | ५०० | ० | ० | ६६२८ | ० |
| | एकुण खरीप पिके | ९२२८८ | ९०६६३ | ९८ | ५५०७६ | ५४६४१ | ९९ | ६८७६० | ६७९१३ | ९९ | ४३२०३२ | ४३१६८८ | ९९.९७ |

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
अकोला

मुख्य कार्यकारी अधिकारी
अकोला

जिल्हाधिकारी
अकोला